




Title Code- MAHMAR-51647

दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!








संपादक : जितेंद्र कायस्थ

Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com



वर्ष ३ रे | अंक : ७५९. वा | शुक्रवार | दि. ०३ मे २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३रुपये


# जिल्हा रुग्णालयातील भ्रष्टाचार म्हणजे हमाम में सब...

## अधिकाऱ्यांशी साटेलोटे अन् भ्रष्टाचाऱ्यांची चंगळच चंगळ

### जिल्हा सामान्य रुग्णालय भ्रष्टाचार प्रकरणात निलंबन कारवाई करून करोडो रुपयातून जमवलेली संपत्ती /अपसंपदा शेती, घर,प्लॉट,फ्लॅट,बंगला सह उच्च दर्जेतील आरामदायी चार चाकी सोंन चांदी अश्या बऱ्याच महागड्या वस्तू !

**पोस्टमार्टम ७६**

जनसंचलन/बुलढाणा

येथील जिल्हा रुग्णालयाच्या भ्रष्टाचारासंदर्भात बोलायचे झाले तर हिंदीतील म्हण हमाम में सब ही अगदी चपखल बसते. कारण भ्रष्टाचार करणारे कर्मचारी असो की कनिष्ठ अधिकारी या सर्वांनी वरिष्ठ अधिकारी म्हणजे वैद्यकीय अधीक्षक, जिल्हा शल्यचिकित्सक किंवा त्याहूनही वरिष्ठ अधिकाऱ्यांशी पद्धतशीरपणे अंडरस्टँडिंग (म्हणजेच मराठीत साटेलोटे) करून एव्हढा सफाईदार भ्रष्टाचार केला की, त्या भ्रष्टाचाराचा माग काढण्यात आणि भ्रष्टाचाऱ्यांना कायद्याने शिक्षा देण्यात शासन व प्रशासन पूर्णपणे असफल झाल्याचे दिसत आहे. सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनच्या पुढाकारातून या भ्रष्टाचाराला कमीत कमी वाचा तरी फुटू शकली असती, अन्यथा तेरी भी चूप, मेरी भी चूप अशी स्थिती या भ्रष्टाचाराबाबत होती. येथील जिल्हा रुग्णालयातील भ्रष्टाचार खरंच अगदी आगळावेगळा असा आहे. या ठिकाणी कोण्या एका अधिकारी किंवा कर्मचाऱ्याने भ्रष्टाचार केलेला नाही. येथे स्थिती दाल में काला नहीं, पूरी दाल ही काली है अशी आहे. जिल्हा रुग्णालयात गेल्या काही वर्षांमध्ये उपकरणे व औषधे घरेदीत प्रचंड प्रमाणात भ्रष्टाचार झाला. सुरवातीला अत्यंत आतल्या आत गुप्तपणे सुरू असलेल्या या शेकडो कोटींच्या भ्रष्टाचाराचा भंडाफोड सिटी न्यूज व दैनिक जनसंचलन ने केला आणि या भ्रष्टाचाराला अक्षरशः कंठच फुटला. यानंतर या भ्रष्टाचाराला बुलढाण्याचे आमदार संजय गायकवाड यांनी थेट विधानसभेत नेऊन हा भ्रष्टाचार राज्यस्तरावर उघड केला. आमदार संजय गायकवाड यांच्या आरोपांनुसार हा घोटाळा तब्बल ९९ कोटी रुपयांचा आहे. भाजपा प्रवक्ता विनोद वाघ यांनी आंदोलनाची तक्रार देऊनही दोषींवर कोणतीच कारवाई नाही .परंतु सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनच्या सूत्रांची माहिती आहे की, हा घोटाळा त्याहूनही कितीतरी पटींनी जास्त आहे. विशेष म्हणजे हा संपूर्ण भ्रष्टाचार झालेला आहे, हा आता केवळ आरोप राहिला नाही. शासनाने आजवर ज्या काही समित्या नेमल्या त्या समित्यांच्या अहवालात आणि लेखापरीक्षणात हे सिद्ध देखील झालेले आहे. तरीही वरिष्ठ अधिकारी या ठिकाणी येतात, चौकशी केल्याचे नाटक करतात, खाण्यापिण्याची मौजमजा करतात आणि येथून निघून गेल्यानंतर भ्रष्टाचाराचे अहवाल उघड होत नाहीत, कुठलीही कारवाई होत नाही. या संपूर्ण भ्रष्टाचाराच्या प्रकरणात केवळ आणि केवळ एका अधिकाऱ्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आलेली आहे. यापेक्षा जास्त यात काहीही करण्यात आलेले नाही. आम्ही वर म्हटल्याप्रमाणे गेल्या काही वर्षांत जिल्हा रुग्णालयातील कर्मचाऱ्यांसह अगदी जिल्हा शल्यचिकित्सकांपर्यंत सर्वच जणांनी डुकराप्रमाणे स्वतःला या भ्रष्टाचाराच्या गटारगंगेत यथेच्छ डुंबवून घेतलो होते, त्यामुळे या ठिकाणी झालेला भ्रष्टाचार सामूहिक व संगनमताने झाला आहे, त्यामुळे खरे तर हा संगठित गुन्हेगारीचा प्रकार आहे. त्यामुळे या सर्व कर्मचारी, कनिष्ठ अधिकारी व जिल्हा शल्यचिकित्सकांपर्यंत सर्वांवरच मोक्का अंतर्गत कारवाई केली वावगे ठरणार नाही. या भ्रष्टाचारात २०२२-२३ मध्ये या ठिकाणी कार्यरत असलेले जिल्हा शल्यचिकित्सक तर एव्हढ्या गेंड्याच्या कातडीचे होते की, या भ्रष्टाचारासंदर्भात योग्य ती चौकशी करून कारवाई करण्याचे निर्देश

**अवैध मार्गाने भ्रष्टाचार करून जमवलेली सर्व संपत्तीची माहिती आयकर विभाग,एसीबी यांना लवकरच पुराव्यानिशी देणार**

आरोग्य उपसंचालक कार्यालयाकडून वारंवार प्राप्त झाल्यानंतर देखील त्यांनी कारवाई केली नाही. यावरून स्पष्ट आहे की, हा तत्कालीन जिल्हा शल्यचिकित्सकांचा ढिसाळपणा नाही, तर हा जाणुनबुजून केलेला गंभीर प्रकार आहे. वरिष्ठांच्या आदेशाला केराची टोपली दाखवणारा एव्हढा नालायक व बेशरम अधिकारी बुलढाणा जिल्हा रुग्णालयाने यापूर्वी खचितच पाहिला असेल. बरं विशेष म्हणजे या भ्रष्टाचारातून जमवलेली प्रचंड अशा कोट्यवधी रुपयांच्या पैशांमधून या अधिकाऱ्यांनी विविध ठिकाणी संपत्ती घेऊन ठेवली आहे. भ्रष्टाचारातून मिळवलेली ही संपत्ती अवैध तर आहेच, परंतु अनैतिक देखील आहे. परंतु या महाभ्रष्टाचारी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याऐवजी या ठिकाणचे अधिकारी हे भ्रष्टाचाऱ्यांना वाचवण्यासाठी जिवाचा आटापीटा करीत असल्याचे दिसून येत आहे. चौकशी समित्याही आपले काम चोखपणे बजावताना दिसून येत नाही. कारण त्या केवळ येतात चौकशी करतात आणि निघून जातात. नंतर त्या चौकशांचे काय झाले, चौकशी अहवालांच्या भेंडोळीचे पुढे काय झाले, याची कसलीही माहिती ही जनतेला प्राप्त होत नाही. यावरून हे संपूर्ण भ्रष्टाचाराचे प्रकरण मॅनेज करण्यासाठी अगदी वरतून जोरदार प्रयत्न होताना दिसून येत आहे. आमदार गायकवाड यांच्याही लक्षवेधीवर केवळ चौकशांची नाटकं केली जात आहेत. अधिकारी येतात, मेजवानीवर यथेच्छ ताव मारतात, जाताना कसलीतरी पार्सले घेऊन जातात. यापुढे जाऊन मात्र कोणताही अहवाल समोर येत नाही आणि कोण्या




भ्रष्ट अधिकाऱ्यावर काय कारवाई झाली, याची माहिती मात्र कधीच समोर येत नाही. सिटी न्यून व दैनिक जनसंचलनसारखी जनतेसाठी सातत्याने लढणारी वृत्तपत्रे आणि काही सामाजिक संघटनांचे पदाधिकारी या भ्रष्टाचाऱ्यांविरोधात आवाज उठवतात. सध्या सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत खरात हे या भ्रष्टाचाविरोधात लढणारे योद्धे आहेत. त्यामुळे काही प्रमाणात का होईना परंतु या भ्रष्टाचारासंदर्भात सातत्याने चर्चा होत राहते. आगामी काळात यासंदर्भात योग्य ती कारवाई झाली नाही, आणि भ्रष्टाचाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्या आली नाही, तर आगामी काळात आणखी जोरदार प्रयत्न केले जातील, असे मत त्यांनी दैनिक जनसंचलनशी बोलताना व्यक्त केली. त्यामुळे सिटी न्यूज दैनिक जनसंचलन भ्रष्टाचारविरोधातील आपल्या लढाईला आणखी गतिमान करण्यासाठी प्रयत्न करीत राहणार आहे. जोपर्यंत भ्रष्टाचाऱ्यांच्या विरोधत कारवाई केली जात नाही, तोपर्यंत दैनिक जनसंचलन कधीही मागे हटणार नाही.

अजून बरेच काही पुढील भागात

# विश्वकर्मा कॉलेज ऑफ नॅचरोपॅथी अ‍ॅन्ड योगी सायन्स अमरावतीव्दारे नि:शुल्क शिबिराचे आयोजन...

वृत्तसंस्था/ अमरावती

विश्वकर्मा कॉलेज ऑफ नॅचरोपॅथी अ‍ॅन्ड योगी सायन्स अमरावतीव्दारे रविवार दि. ५ मे २०२४ रोजी सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत नि:शुल्क आरोग्य तपासणी व रोगोपचार शिबिराचे आयोजन करण्यात आलेले आहे. आजच्या व्यस्त जीवनशैलीमध्ये अनेक व्यक्ती आजारांना बळी पडतात. आजारांचे डिप्रेशन, फोबिया, भय, लठ्ठपणा, मायग्रेन, मधुमेह, सायटिका, मणक्यांचे आजार, डोकेदुखी अशा अनेक शारीरिक तथा मानसिक समस्यांना व्यक्ती दिवसेंदिवस बळी पडत आहे. अशा विविध समस्यांवर विना औषधी उपचार करणे ही आजची गरज आहे. जेणेकरुन वारंवार औषधोपचारामुळे शरीरावर होणा-या दुष्परिणामांना सामोरे जावे लागते व यामध्ये अनेक व्याधी नव्याने निर्माण होतात. त्यासाठी प्रत्येक रुग्णांच्या नाडी परीक्षणाची गरज असते व हे नाडी परीक्षण सदर शिबिरात करण्यात येणार आहे. यासाठी नि:शुल्क आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आलेले असून या शिबिरात निसर्गोपचार सुजोक, ॲक्युप्रेशर, कायरोथेरपी, (बोन सेटिंग) रंगचिकित्सा, योगा थेरपी या उपचार पध्दतीव्दारे तपासणी करण्यात येईल. याकरीता सर्व नागरिकांना या शिबिरास भेट देऊन आरोग्य विषयक माहितीचा लाभ घेण्याची संधी उपलब्ध होत आहे. अधिक माहितीसाठी डॉ. रणजीत बसवनाथे (९४२०८५६१०५) व डॉ. आनी राऊत (८०८७७४१४६१) या भ्रमणध्वनीवर संपर्क साधण्याचे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आलेले आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# ब्राह्मण सभा बुलढाणाच्या वतीने जागतिक कामगार दिनानिमित्य श्रमजिवी जाती बांधवांचा सन्मान सोहळा संपन्न



**जनसंचलन/बुलढाणा**

१ मे महाराष्ट्र दिन आणि जागतिक कामगार दिनानिमित्य बुलडाणा ब्राह्मण सभेच्या वतीने दि. १मे बुधवारला स्थानिक श्रीरामजानकी सभागृहात सायं. ७ ते ८.३० या वेळेत समाजामध्ये जे बंधु व भगिनी वर्ग कामगार क्षेत्रात उत्तम कर्तव्य पार पाडीत आहेत, अशा श्रमजिवी जाती बांधवांचा सन्मान व सत्कार समारंभ मोठ्या उत्साहात मंगलमय व भावपूर्ण वातावरणात संपन्न झाला. उपरोक्त सत्कार-समारंभ प्रसंगी व्यासपीठावर प्रामुख्याने ब्राह्मण सभेचे अध्यक्ष ॲड प्रदीप कविमंडन प्रमुख अतिथी श्री मधुसुदन कुळकर्णी, संस्कृत भारतो बुलढाणा विभाग संयोजक प्रा. विजय जोशी, श्रमजिवी जाती बांधवांच्या प्रतिनिधी तथा अध्यक्ष सौ. विद्याताई मुळे, बुलडाणा ब्राह्मण सभेचे उपाध्यक्ष श्री. प्रकाश पाठक प्रामुख्याने उपस्थित होते. उपरोक्त सत्कार समारंभाचा शुभारंभ भगवान श्री परशुराम प्रतिमा पूजन व दीप प्रज्वलनाने मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी मे जागतिक कामगार दिनाचे औचित्य साधून ब्राह्मण समाजामध्ये श्रमजीवी जीवन जगून आपल्या कुटुंबाचा जीवन निर्वाहरण करणारे जे सेवाभावी, कष्टाळू, प्रामाणिक, समाजाप्रती एकनिष्ठ असणारे प्रातिनिधिक स्वरूपातील बंधू आणि भगिनींना मान्यवरांच्या हस्ते शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन बुलढाणा ब्राह्मण संघटनेच्या वतीने भावपूर्ण सत्कार व गुणगौरव करण्यात आला. उपरोक्त प्रसंगी सौ. विद्याताई मुळे, छाया मुर्तीजापूरकर शकुंतला शर्मा, सुनिता कुळकर्णी, श्री पाठक, प्रफुल्ल कुळकर्णी, दिलीप चिटणीस, गोविंद दलाल, शंकर उपाध्ये यांचा सत्कार संपन्न झाला. बुलढाणा ब्राह्मण सभा आयोजित सत्कार समारंभ प्रसंगी प्रा. विजय जोशी, मधुसुदन कुळकर्णी, सौ. विद्याताई मुळे, बाबासाहेब वरणगांवकर यांनी आ-पली मनोगते व्यक्त केलीत, प्रास्ताविक परिचय ॲड प्रदीप कविमंडन, सुत्रसंचलन डॉ. गायत्री सावजी, आभार प्रकाश पाठक, पसायदान सौ. अंजलीताई परांजपे यांनी केले. प्रायोजकत्व अरविंद बायोटेकच्या संचालिका सौ. दिपाली देशपांडे, श्री. अरविंद देशपांडे यांनी केले. उपरोक्त कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी बुलढाणा ब्राह्मण सभा आयोजित उपरोक्त सत्कार समारंभ प्रसंगी समाजातील प्रतिष्ठीत बंधू आणि भगिनी वर्ग बहुसंख्येने उपस्थित होता. यामध्ये प्रामुख्याने सर्वश्री नाना केसाळे, दिपाली देशपांडे, अरविंद देशपांडे (अरविंद बायोटेकचे प्रमुख, गजानन नानोटी, डि डि जोशी,प्रभाकरराव पत्की, सुरेंद्र मुळे, अरूण देशपांडे, मोहन केसाळे, नितीन काळे, लक्ष्मीकांत मोहरील, सौ. प्रज्योती सावजी, सौ. कुळकर्णी, सौ. केसाळे, सौ. प्रभा देशपांडे उपस्थित होते. सामूहिक पसायदानाने कार्यक्रम संपला,

# पलढग येथे क्षुल्लक कारणावरून तिघांना मारहाण गुन्हा दाखल



**जनसंचलन/मोताळा**

मतदान करायला माझ्या गाडीमध्ये कां बसला या शुल्लक कारणावरुन पती, पत्नीसह तिघांना मारहाण केल्याची घटना ३० एप्रिल रोजी सकाळी ९.३० वाजता पलढग येथे घडली. याप्रकरणी बोराखेडी पोलिसांनी तिघांवर गुन्हा दाखल केला आहे. मोताळा तालुक्यातील पलढग येथील उत्तम तोताराम जाधव यांनी बोराखेडी पोलिसात फिर्याद दिली की, मतदानाच्या दिवशी तुम्ही मतदान करायला माझ्या गाडीत कां बसले नाही?, असे म्हणत महेंद्र सुरेश जाधव याने फिर्यादीच्या डोक्यात काठी मारुन जखमी केले. तर लताबाई सुरेश जाधव व सीमा महेंद्र जाधव यांनी उत्तम जाधव यांची मुले व पत्नीला चापटा बुक्क्यांनी मारहाण करीत शिविगाळ करुन जीवे मारण्याची धमकी दिली. अशा फिर्यादीवरुन बोराखेडी पोलिसांनी उपरोक्त तिघांवर भादंवीचे कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६, ३४ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

# डिजेच्या गाण्यावरून वरातीवर हल्ला

## हाणामारीत एक गंभीर, तर काही किरकोळ जखमी

**जनसंचलन/धाड**

लग्नाच्या वरातीत डिजेवर वाजणाऱ्या गाण्यावरुन विशिष्ट समाज व वऱ्हाड्यांमध्ये हाणामारी झाल्याची घटना आज ३० एप्रिल रोजी सायंकाळी बोरखेड (ता. बुलढाणा) येथे घडली. या हाणामारीत वरातीत सहभागी अस-लेला एक गंभीर तर दोघे किरकोळ जखमी झाले असून त्यांना उपचारार्थ बुलढाणा येथे हलविण्यात आल्याची माहिती आहे. धाड पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या बोरखेड (ता. बुलढाणा) येथील भगवान तायडे यांच्या मुलीचा विवाह सोहळा आज ३० एप्रिल रोजी बोरखेड येथे आयोजित करण्यात आला होता. सायंकाळी सहा वाजता मराठवाड्यातील सोनगिरी येथील वऱ्हाडी मंडळीने डिजेच्या तालावर गावातन नवरदेवाची वरात सुरु केली काही पोलिसांत अंतरावर गेल्यानंतर डिजेमध्ये वाजण्यावर गाण्यावरुन विशिष्ट समाजातील लोकं व वरातीत सहभागींमध्ये वाद झाला. वादाचे रुपांतर हाणामारीत होऊन अचानक वरा-तीवर दगडफेक सुरु झाली. तसेच २५-३० जणांच्या टोळक्याने वरातीत सहभागी लोकांना लाठ्या-काठ्यांनी मारहाण केली. या मारहाणीत पारध येथील एक वऱ्हाडी गंभीर तर सचिन बावस्कर याच्यासह अन्य काही जण किरकोळ जखमी झाल्याची माहिती आहे. जखमींना तत्काळ उपच-रार्थ रुग्णालयात भरती करण्यात आले. दरम्यान, घटनेची माहिती मिळताच ठाणेदार नरेंद्र पेंदोर व त्यांच्या सहकाऱ्यांनी तत्काळ बोरखेड गाठून परिस्थिती नियंत्रणात आणून गावकऱ्यांना शांततेचं आवाहन केले असून गावात तणावपूर्ण शांतता आहे. पोलिसांनी डिजे जप्त केला

# भाजपा युवा मोर्चा बुलढाणा तालुक्याची कार्यकारणी घोषित

**जनसंचलन/बुलढाणा**

भारतीय जनता पार्टी बुलढाणा तालुक्याची युवा कार्यकारिणी आ. श्वेताताई महाले पाटील, जिल्हाध्यक्ष गणेश मांटे, माजी आमदार विजयराज शिंदे, विधानसभा प्रमुख योगेंद्र गोडे, बुलढाणा तालुका अध्यक्ष ॲड. मोहन पवार, भाजयूमो जिल्हाध्यक्ष विनायक भाग्यवंत यांच्या मार्गदर्शनात तसेच पक्षातील वरिष्ठ पदाधिकारी, कार्यकर्ते यांच्याशी विचार विनिमय करून भारतीय जनता युवा मोर्चा बुलढाणा तालुका अध्यक्ष सतिश भाकरे पाटील यांनी महाराष्ट्र दिनाच्या मुहूर्तावर आपली तालुका कार्यकारिणी प्रसिद्धी पत्रकाद्वारे जाहीर केली. यामध्ये अध्यक्ष, सहा सरचिटणीस, बारा उपाध्यक्ष, पंधरा चिटणीस व सदस्य असे एकूण ८३ युवकांचा समावेश या तालुका कार्यकारणीत करण्यात आला आहे. बुलढाणा तालुका भाजपा युवा मोर्चा कार्यकारिणी घोषीत करण्यात आली आहे. अध्यक्ष सतिश भाकरे पाटील, तालुका सरचिटणीस सर्वश्री गोपाल तायडे, प्रवीण वाघ, प्रदीप मांडवगडे, नितीन उगले, अमोल पडोळ, राजेश पाठक, तालुका उपाध्यक्ष सर्वश्री केशव तरमळे, सोपान जगताप, प्रवीण गाडेकर, गजानन सपकाळ, राजेश अपार, प्रमोद वाघ, अमोल सोन-ुने, गणेश काळवाघे, अमोल जाधव, रवींद्र दौलत पवार, ऋषिकेश हागे, बाळू ठाकरे, तालुका चिटणीस सर्वश्री सागर भास्करराव जट्टे, सोनू तायडे, आकाश बोडखे, संदीप जायभाय, सागर पाटील, विजय हिवाळकर, कुणाल काळे, ज्ञानेश्वर तांगडे, गणेश दौलत जाधव, राहुल शेळके, सुदर्शन कांबळे, विजय दामोदर जेउघाले, स्वप्नील जाधव, तौसिक जमादार, राजेश रामधन कोल्हे, तालुका कार्यकारिणी सदस्य सर्वश्री भारत संतोष शेळके, आशिष शेळके आदी उपस्थित होते. वारे, शंकर भिंगारे, सागर इंगळे, दत्ता सोनुने, शरीफ शेख फारूक, अमोल जगताप अजिसपूर, गजानन चव्हाण केसापुरे, समाधान सुसर, नंदू सपकाळ, समाधान बोराडे, सारंग सुरोसे, रामू पैठणे, राजू जाधव, अनिल बोराडे, समाधान साखरे, पवन वाघेरे आदी उपस्थित हो-ते. दिलीप आडवे, सुजय रिंधे, सचिन कवलकर, भागवत साखरे, अविनाश क्षीरसागर, सचिन भोंडे, अजय कांडजे, अक्षय भालेराव, शरद पालकर, श्रीराम पिंपळे, गजानन तायडे, अमोल पालकर, संतोष ताबडे साखळी बुद्रुक, प्रदीप सोन-वणे, अमोल निंबळे, अमोल सोनवणे, आंबोळे आदी उपस्थित होते. जामुंडे बोडेगाव, परमेश्वर निंबाजी वाघ इरला, दत्ता ताठे जांब, अमोल बारवाल जनुना, नीलेश राऊत, सागर रिंधे, अनिल बोराडे कुंभेफळ, विनोद भाकरे, अनिल सुखदेव उबरहंडे, अमोल गायकवाड, समाधान पडोळ, गणेश विठ्ठल बोडखे, शुभाराम पंडोळ, इंदिरा गांधी, डी. पुढील तीन वर्षासाठी तालुका कार्यकारिणीवर आकाश सोनुने, रोहन महामुने, शुभम भुते, अभिषेक मोहिते यांची एकमताने निवड करण्यात आली आहे.

# जिल्हाधिकारी कार्यालयात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जयंती साजरी

**जनसंचलन/बुलडाणा**



जिल्हाधिकारी कार्यालयात आज राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जयंती साजरी करण्यात आली. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जयंतीनिमित्त उपजिल्हाधिकारी सुरेश थोरात यांनी प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी उपजिल्हाधिकारी समाधान गायकवाड, अक्षय गाडगे, नाझर गजानन मोतेकर, सुरेश खोडके आदी उपस्थित हो-ते. उपस्थितांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांना अभिवादन केले.

The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीची प्रहरी!




# महाराष्ट्र दिनानिमित्त ध्वजारोहण उत्साहात साजरा



**जनसंचलन/बुलडाणा**

महाराष्ट्र दिनानिमित्त ध्वजारोहणाचा मुख्य सोहळा येथील पोलिस कवायत मैदानावर पार पडला. जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी ध्वजारोहण केले. त्यानंतर त्यांनी परेडची पाहणी केली. यावेळी विविध क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या अधिकारी, कर्मचारी यांचा सत्कार करण्यात आला. महाराष्ट्र दिनाच्या ६४वा वर्धापन दिनानिमित्त सकाळी ८ वाजता ध्वज-रोहण करण्यात आले. यावेळी पोलिस दल आणि होमगार्डने मानवंदना दिली. परेड निरीक्षण केल्यानंतर परेड संचलन करण्यात आले. महाराष्ट्र दिनानिमित्त विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या अधिकारी कर्मचाऱ्यांचा जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यात जिल्हा पोलीस दलातील सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक दीपक इंगळे, पो-लीस निरीक्षक हेमंत ठाकरे, पोलिस हवालदार विकास खानझोडे, सुखदेव ठाकरे, संजय नागरे, चालक पोलीस हवालदार शेख वसीम शेख मेहबूब यांचा सन्मानचिन्ह आणि विशेष सेवा पदक देऊन गौरव करण्यात आला. जिल्हाधिकारी कार्यालयातर्फे मासरूळ, ता. बुलढाणाचे तलाठी एस. पी. शहागडकर यांना प्रश-स्तीपत्र आणि आदर्श तलाठी पुरस्कार प्रदान करण्यात आला. लोकसभा निवडणूक आदर्श आचारसंहिता कालावधीत भरीव कामगिरी केल्याबद्दल राज्य उत्पादन शुल्कचे निरीक्षक आर. एम. माकोडे, दुय्यम निरीक्षक आर. आर. उरकुडे, जवान एस. एस. जाधव, एन. एम. सोळंकी, पी. एच. पिंपळे, श्रीमती एस. एस. उंबरहंडे यांचा प्रश-स्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला. मनरेगाच्या उत्कृष्ट अंमलबजावणीबद्दल तालुका कृषी अधिकारी अमोल बनसोडे, कृषी सहाय्यक रवींद्र जाधव, वासुदेव भोई, शंकर वाघमारे यांचा प्रश-स्तीपत्र देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक सुनील कडासने, मुख्य कार्यकारी अधिकारी बी एम मोहन, निव-ासी उपजिल्हाधिकारी निर्भय जैन, उपजिल्हाधिकारी सदाशिव शे-लार, समाधान गायकवाड, अक्षय गाडगे, जयश्री ठाकरे आदी अधिकारी कर्मचारी उपस्थित हो-ते. नाझर गजानन मोतेकर आणि मंगेश मोरे यांनी सूत्रसंचालन केले.

# दे.माळी येथील वीर स्व.स्वातंत्र्यसेनानी नारायण सुरूशे यांच्या पत्नीचे दुःखद निधन



**जनसंचलन/मेहकर**

देऊळगाव माळी तालुका मेहकर येथील वीर स्व. स्वातंत्र्य सेनानी नारायण बळवंत सुरूशे यांच्या वीर पत्नी स्व. द्वारकाबाई नारायण सुरूशे दे. माळी ता.मेहकर यांचे दिनांक २९ एप्रिल २०२४ रोजी दुप-ारी तीन वाजताच्या दरम्यान वृद्धापकाळाने देवाज्ञा झाली. त्यांच्या अंत्यविधीचा कार्यक्रम दिनांक ३० एप्रिल वार मंगळवार ला सकाळी ८ वा. संपन्न झाला तर रक्षा विसर्जनाचा कार्यक्रम एक मे रोजी सकाळी दहा वाजताच्या दरम्यान संपन्न झाला. यावेळी मेहकर तहसीलचे तहसीलदार निलेशजी मडके, तहसीलदार यांच्या सुविद्य पत्नी सौ. रत्नमाला मडके, मंडळ अधिकारी राजेंद्र आव्हाळे, तलाठी सौ.निर्मलाताई, व तसेच प्रशासनातील अधिकारी व कर्मचारी त्याचबरोबर पत्रकार मंडळी, समस्त गावकरी मंडळी, या वीर पत्नीला अखेरचा निरोप देण्यासाठी हजर होते.

# सहकार विद्या मंदिरमध्ये उन्हाळी क्रीडा शिबीराची उत्साहात सुरुवात...



**जनसंचलन/ बुलढाणा**

स्थानिक सहकार विद्या मंदिरमध्ये उन्हाळी क्रिडा शिबीराला १५ एप्रिल ते ०४ मे, २०२४ उत्सा-हात सुरुवात झाली. या शिबीरात मोठया संख्येने विद्यार्थी सहभागी झाले आहे. सदर क्रीडा शिबीरामध्ये विद्यार्थ्यांना विविध प्रकारांचे अनुभवी प्रशिकांकडून प्रशिण देण्यात येत आहे. यामध्ये स्विमिंग, स्केटिंग ,क्रिकेट, बास्केटबॉल, डान्स शिकविण्यात येत आहे. दरवर्षी शालेय प्रशासनाकडून विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या कलागुणांना वाव देण्याचे कार्य केले जाते. मान्नसिक , बौद्धिकेते सोबत, विद्यार्थी शारीरिकदृष्टयां सदन्न असणे ही काळाची गरज आहे. दिन्नांक १५ एप्रिल ते ४ मे, २०२४ या कालावधीत संध्याकाळी ४.०० ते ७.०० या वेळेत हे शिबीर सुरु आहे. विद्यार्थ्यांच्या मोठया प्रतिसादामुळे दि.०६, मे २०२४ ते २५ मे दरम्यान दुसरी बॅच सकाळच्या कालावधीमध्ये सुरु होणार आहे. सदर शिबीराच्या उद्घाटन्नप्रसंगी बुलढाणा अर्बन्न चॅरिटेबलच्या अध्याा सौ.कोमल झंवर, बुलढाणा अर्बन्नचे मुख्य कार्यकारी संचालक डॉ.सुकेशजी झंवर यांची उपस्थिती लाभली होती. मान्यवरांन्नी या शिबीरातील उत्साही विद्यार्थ्यांचे व साहसी क्रीडा प्रशिणाचे कौतुक केले. सदर कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सहकार विद्या मंदीरचे प्राचार्य, मुख्याध्यापक , जन्नसंपर्क अधिकारी, प्रशासकीय अधिकारी , शालेय क्रीडा प्रशिाक व इतर सर्व कर्मचारी या शिबीरासाठी अथक परिश्रम घेत आहे.

# एटीएम कार्ड बदलून दोघांची केली ७० हजारांची फसवणूक




**जनसंचलन/बुलढाणा**

एसबीआय शाखा सुंदरखेड येथे पैसे काढण्यासाठी गेलेल्या वृद्धाचे एटीएम कार्ड बदलून अनोळखी इसमाने फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याबाबत शहर पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीवरून अज्ञात विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत मिळालेली माहिती अशी की, दगडू राम दराखे (८० वर्ष) यांनी शहर पोलीस ठाण्यात तक्रार दिली. दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे की २९ एप्रिल रोजी सुंदरखेड येथे एटीएमकार्ड मधून पैसे काढण्याचा प्रयत्न केला असता पैसे निघाले नाही. त्यावेळी रांगेत उभे असलेल्या एका अनोळखी इसमाने समोर येवून पैसे काढले. त्यांनतर तो म्हणाला की, काका तुमचे पैसे निघ-ाले नाही का? मी प्रयत्न करतो! असे म्हटल्यावर फिर्यादी दराखे यांनी विश्व-ासाने एटीएमकार्ड दिले. त्यानंतर त्या अनोळखी इसमाने ( अंदाजे ३५ वर्ष ) एटीएम कार्ड घेवुन मशीनमध्ये टाकले आणि पासवर्ड विचारला. त्यानंतर दोनवेळेस प्रयत्न केल्यानंतर तुमचे कार्ड लॉक झाले आहे असे म्हणत त्याने एटीएम कार्ड परत केले. त्यानंतर फिर्यादी दराखे हे घरी गेल्यानंतर त्यांचे फोनवर दहा हजार रुपये निघाल्याचा मेसेज आला. त्यानंतर दर दोन मिनिटांनी परत दहा हजार रुपये निघाल्याचे आणि पाचशे रुपये निघाल्याचा संदेश फिर्यादी दराखे यांना मिळाला. असे पूर्ण चार मेसेज मिळून एकूण ३० हजार पाचशे रुपये पंजाब नॅशनल बँक खात्यातून निघाल्याचे लक्षात आले. त्यानंतर बारकाईने एटीएम कार्ड तपासले असता ते आपले नसल्याचे त्यांना समजले. आपल्यासारखीच फसवणूक अर्जुन बधु पवार (रा. देवानगर,ता. लोण-ार.) यांची सुद्धा झाली होती. विशेष म्हणजे त्याच अनोळखी व्यक्तीने ४० हजाराने त्यांना गंडा घातला होता. अशी माहिती फिर्यादीला मिळाली. दोघांची मिळून ७० हजाराने फसवणूक झाल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

# जिल्हा पोलीस अधीक्षक सुनील कडासने यांचा डिजे मालकांना गंभीर इशारा...

## आवाज नको वाढवू डीजे एसपी सुनील कडासने ॲक्शन मोडवर...

## परवानगी आवश्यक अन् आवाज मर्यादित ठेवा अन्यथा...






**जनसंचलन/बुलढाणा**

सध्या लगीनसराई सुरू आहे, लग्न सोहळ्यात अनेकजण डिजे लावताना दिसत आहेत. अशातच डीजेच्या वाढत्या आवाजामुळे आरोग्याला धोका निर्माण झाल्याचे दिसत आहे. तर काही ठिकाणी आक्षेपार्ह गाणे वाजवल्यामुळे दंगलसदृश परिस्थिती निर्माण झाल्याच्या घटना समोर आल्या आहेत. त्यामुळे अशा प्रकारच्या घटना रोखण्यासाठी पोलीस विभागाने महत्वाचे पाऊल उचलले आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक सुनील कडासने आता ॲक्शन मोडवा आले आहे डीजे मालकांना त्यांनी गंभीर इशारा दिला आहे.मर्यादेपेक्षा जास्त आवाज असला किंवा परवानगी नसली तर डीजेचे वाहन थेट पोलीस ठाण्यात जमा करण्याचे आदेश एसपी सुनील कडासने यांनी दिले आहे. आज गुरुवार, २ मे रोजी आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना त्यांनी याबाबत माहिती दिली. आतापर्यंत २२ डीजे धारकांवर कारवाई करण्यात आली आहे. शासनाच्या निर्देशानुसार, ७५ टक्के डिसिमल पेक्षा जास्त आवाज असला तर कारवाई करण्यात येईल. नागरिकांनी कायद्याचे पालन करून आनंद साजरा करावा. मानवी जीवाला कुठल्याही प्रकारचा धोका निर्माण होणार नाही याची काळजी घ्यावी. अन्यथा कठोर स्वरूपाची कारवाई करण्यात येणार असल्याचे एसपी सुनील कडासने म्हणाले. डीजे गाड्यांच्या मॉडिफिकेशन बाबत प्रतिबंध लावण्यासाठी आरटीओ विभागातून सूचना दिल्या जातात. त्यामुळे पोलीस विभाग तसेच आरटीओ विभागाद्वारे आता डीजे धारकांवर कडक वॉच वाचणार आहे. समारंभ, सोहळ्यात डीजेची परवानगी मिळवण्यासाठी जवळील पोलीस ठाण्यात अर्ज करावा लागेल. तसेच आरटीओ विभागातर्फे सुद्धा मोठे पावले उचललेले आहे. सदर कारवाई करून डीजेवर दंडात्मक स्वरूपाची मोठी कारवाई करण्यात येणार आहे.

# तिसऱ्या टप्प्यात २६ हजार मतदारांचे गृहमतदान, सर्वाधिक ४ हजार ५८८ अर्ज धाराशीव मतदारसंघात



**वृत्तसंस्था/मुंबई**

केंद्रीय निवडणूक आयोगाने यंदापासून प्रथमच ८५ वर्षावरील, आणि दिव्यांग मतदारांसाठी गृहमतदानाचा (घरातून पोस्टल मतदान करण्याची मुभा) पर्याय उपलब्ध करून दिला आहे. याअंतर्गत राज्यात आगामी तिसऱ्या टप्प्यात ११ लोकसभा मतदारसंघासाठी २६ हजार २११ मतदारांनी नोंदणी केली आहे. यात प्रामुख्याने धाराशीव (उस्मानाबाद) मतदारसंघामध्ये सर्वाधिक चार हजार ५८८, तर सर्वात कमी बारामती मतदारसंघासाठी फक्त ४३१ गृहमतदारांनी नोंदणी केली असल्याची माहिती निवडणूक आयोगातील सूत्रांनी दिली. राज्यात तिसऱ्या टप्प्यात मराठवाड्यातील दोन, पश्चिम महाराष्ट्र सात, कोकणातील दोन अशा एकूण ११ मतदारसंघात येत्या ७ मे रोजी मतदान होत आहे. या मतदारसंघांमध्ये २५८ उमेदवार रिंगणात असून, यात सर्वाधिक ३८ उमेदवार बारामती मतदारसंघातील आहेत. त्यानंतर माढा मतदारसंघात ३२, तर धाराशीव मतदारसंघात ३१ उमेदवार अंतिम यादीत असल्याचे सांगण्यात येते.तिसऱ्या टप्प्यात मतदानासाठी एकूण दोन कोटी नऊ लाख ९२ हजार ६१६ मतदारांची नोंदणी झाली आहे. त्यात एक कोटी सात लाख ६४ हजार ७४१ पुरुष, आणि एक कोटी दोन लाख २६ हजार ९४६ महिला आणि ९२९ तृतीयपंथी मतदार आहेत. यात गृहमतदानासाठी २६ हजार २११ जणांनी १२ डी हा अर्ज आयोगाकडे सादर केला आहे. त्यांची छाननी प्रक्रियाही पूर्ण झाली असल्याची माहिती आयोगातील अधिकाऱ्यांकडून देण्यात आली. दुसऱ्या टप्प्यात १४ हजार ६१२ जणांनी गृहमतदानासाठी अर्ज केले होते. त्यामध्ये बुलढाणा मतदारसंघातून सर्वाधिक दोन हजार ९९२ आणि अकोला मतदारसंघातून दोन हजार ६६७ मतदारांचा समावेश होता.

## पत्रकार करण विनोद झनके यांना राष्ट्रीय आयकॉन पत्रकार पुरस्कार जाहीर...!

**जनसंचलन/ मलकापूर**



करण विनोद झनके बुलढाणा जिल्ह्यातील मलकापूर तालुक्यातील ग्रामीण भागातील शाहू फुले आंबेडकर चळवळीतील सामाजिक कार्यकर्ते करण झनके यांची गरुड फाउंडेशनच्या वतीने निवड करण्यात आली आहे. शक्ती वृत्तपत्र व यूट्यूब चैनल चे संपादक आकाश पुजारी यांनी करण झनके यांना निवड पत्र देऊन कळविले आहे. रविवारी पुणे या ठिकाणी मान्यवरांच्या हस्ते राष्ट्रीय आयकॉन पत्रकार पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. पत्रकार क्षेत्रातील भरीव कामगिरी साठी करण झनके यांना पुरस्कार देण्यात येणार आहे.करण झनके यांचे आजवर शाहू फुले आंबेडकर चळवळीतील योगदान सामाजिक क्षेत्रातील विशेष कामगिरीबद्दल पुरस्कार प्रदान करण्यात येत आहे लेखणीच्या माध्यमातून अनेक समस्या सोडवले आहे विविध स्तरातून पत्रकार करण झनके यांच्यावर अभिनंदन व शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# चोरीच्या ट्रकची नोंदणी करणे अमरावतीच्या तीन आरटीओ अधिकाऱ्यांना चांगलीच भोवली

**वृत्तसंस्था/अमरावती**

चोरीच्या ट्रकची बनावट कागदपत्राद्वारे नोंदणी करून विक्री प्रकरणी अमरावती येथील आरटीओच्या तीन अधिकाऱ्यांना अटक करण्यात आली आहे. नवी मुंबईपोलिसांच्या गुन्हे शाखेने दोन महिन्यांच्या सखोल तपासात हे रॅकेट उघड करून एकूण ९ जणांना अटक केली आहे. टोळीचा सूत्रधार हा वापराच्या बहाण्याने ताब्यात घेतलेल्या ट्रकची अमरावती, नागपूर व इतर ठिकाणी नोंदणी करून त्यांची विक्री करत होता. नोंदणीसाठी आलेल्या वाहनांची प्रत्यक्ष पाहणी न करता केवळ कागदी घोडे नाचवून चोरीच्या वाहनांची नोंदणी करणे अमरावतीच्या आरटीओ अधिकाऱ्यांना भोवले आहे. गुन्हेगारांना साथ दिल्याप्रकरणी एका गुन्ह्यात त्यांना अटक करण्यात आली आहे. सहायक परिवहन अधिकारी भाग्यश्री पाटील (४३), मोटर निरीक्षक गणेश वरुटे (३५), व सहायक मोटर निरीक्षक सिद्धार्थ ठोके (३५) अशी त्यांची नावे आहेत. नवी मुंबई गुन्हे शाखेच्या मोटर वाहन विभागाचे वरिष्ठ निरीक्षक शशिकांत चांदेकर यांच्या पथकाने एपीएमसी मधून चोरीचे दोन ट्रक पडकले होते. त्यांचे चेसी नंबर खोटे असून या ट्रकची बनावट कागद्पत्राद्वारे नोंदणी झाल्याचे समोर आले होते. त्याद्वारे सूत्रधार जावेद शेख (४९) याच्या मुसक्या आवळून त्याचे ५ साथीदार व त्यांना मदत करणारे अमरावती येथील ३ आरटीओ अधिकारी यांना अटक केली आहे. महंमद अस्लम शेख (४९), शिवाजी गिरी (४८), अमित सिंग (३३), शेख रफिक शेख दिलावर मन्सुरी (४०), वरून जिभेवर (४१) अशी जावेदच्या सहकाऱ्यांची नावे आहेत. त्यांच्याकडून साडेपाच कोटीचे २९ ट्रक जप्त करण्यात आले आहेत. जावेदचे दोन आधार कार्ड असून तो अरुणाचल प्रदेश, उत्तर प्रदेश, हरियाणा आदी ठिकाणी चोरलेल्या वाहनांचे चेसी नंबर बदलून बनावट कागदपत्रे तयार करायचा. त्याच कागदपत्राद्वारे अमरावती, नागपूर व इतर ठिकाणी त्याने



एजंट व आरटीओ अधिकाऱ्यांच्या मदतीने ट्रकची पुनर्नोंदणी करायचा. त्यानंतर हे ट्रक मुंबई अथवा इतर ठिकाणच्या ट्रान्सपोर्ट व्यावसायिकांना विकायचा. त्याने अमरावती आरटीओ मध्ये ६ तर नागपूरमध्ये १९ ट्रकची नोंदणी केल्याचे समोर आले आहे. त्याद्वारे नागपूर आरटीओमध्येही साथ देणाऱ्यांच्या शोधात पोलिस आहेत. जावेद हा रॅकेटचा सूत्रधार असून त्याच्यावर महाराष्ट्रात १० तर हरियाणात ९ गुन्हे दाखल असल्याचे पोलिस उपायुक्त अमित काळे यांनी सांगितले. याप्रसंगी पत्रकार परिषदेस सहायक आयुक्त अजयकुमार लांडगे यांच्यासह इतर अधिकारी उपस्थित होते.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958